## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

**अपील क्र. ११८९/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सतीश इस्तारी मेश्राम<br>मु. पो. पिंपळगांव (खांबी)<br>ता. अर्जूनी/ मोर. जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय अर्जुनी /मोर<br>ता. अर्जूनी / मोर. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>तहसिल कार्यालय अर्जुनी /मोर<br>ता. अर्जूनी / मोर. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/०९/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०३/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे कनिष्ठ लिपीक श्री एस. डी. प्रधान हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १८/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तालुका कार्यालय अर्जुनी / मोर. यांचेकडे पिंपळगाव येथील सरकारी स्वस्त धान्य दुकानातील माहिती सन २००८ ते २००९ पर्यंतची तसेच या वर्षातील माहे जानेवारी २०१०, फेब्रुवारी २०१० व मार्च २०१० असे एकूण १५ महिन्यांचे विक्री, स्टॉक व बिलबुकचे गोषवारा सहीत दस्तऐवजांची प्रतीलीपींची सत्यप्रत मिळणेबाबत माहिती मागितली आहे. माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले असून अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील आहे असेही नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि. १८/०४/२०१० अन्वये दोन दिवसांचे आत व्यक्तीशः माहिती घेऊन जाण्याचे कळविले होते. परंतू अपीलार्थी हजर राहून माहिती घेवून गेले नाही. परंतू दि. २१/०४/२०१० रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस दि. २१/०६/२०१० ला कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यात आली असे दिसते. परंतू त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. त्यामध्ये संपूर्ण माहिती मिळाली नाही असे कारण दिलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही स्वस्तधान्य दुकानदाराकडील माहिती असल्यामुळे दिलीप मार्तंक मेश्राम यास दि. ०८/०७/२०१० रोजी पत्र देवून उपलब्ध करुन देण्यास कळविले होते. त्याप्रमाणे सर्व कागदपत्रे त्यांनी माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू संपूर्ण कागदपत्रांना छायांकित करण्याचा खर्च हा रु. १५००/- पर्यंत येऊ शकतो. व तेवढा निधी कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे दि. ०४/०८/२०१० रोजी जिल्हाधिकारी यांना निधी उपलब्ध करुन देण्यास पत्र दिले आहे. अशाप्रकारे रु १५००/- चे अनुदान मंजूर झाल्यास अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतःमंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून जिल्हाधिकारी यांचेकडून रु. १५००/- चे अनुदान मंजूर झाल्यावर छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक...................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

## अपील क्र. ११८७/नाग/२०१०
## अपील क्र. ११८८/नाग/२०१०

१. कु. मनिषा हिरामण सोनवाने - **अपीलकर्ती**
तिवारी कॉलोनी, गुरुनानक वार्ड, गणेश नगर, गोंदिया
ता. जि. गोंदिया - ४४१६०१

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी - **उत्तरवादी**
गोंदिया
गौरक्षण वार्ड, जुना बस स्टॅण्ड रोड, गोंदिया

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, गोंदिया
गौरक्षण वार्ड, जुना बस स्टॅण्ड रोड, गोंदिया

**(आदेश पारित दिनांक ०३/०९/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ती यांनी अनुक्रमे अपील क्र. ११८७/नाग/२०१० दि. ०५/०८/२०१० रोजी व अपील क्र. ११८८/नाग/२०१० दि. ३०/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल केली आहेत. या दोनही अपीलांमध्ये अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०३/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीसाठी उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ती हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी अनुक्रमे दि. २४/०५/२०१० व १५/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, गोंदिया यांचेकडे मुलाखती करीता २५ गुणांची वाटणी कोणत्या प्रकारे करण्यात आली याबाबतचा प्रोफॉर्मा (नमुना) पत्रक तसेच सर्व उमेदवार कोणत्या तारखेला रुजु करण्यात आले त्यांचे रुजू पत्राची छायांकित प्रत मिळणेबाबतची संपूर्ण माहिती तसेच निवड उमेदवारांना देण्यात आलेले रुजू पत्र, पत्रव्यवहाराचा पुरावा, पोचपावती/ पोस्टाचा पुरावा जावक नोंदवहीचे पृष्ठांची छायांकित प्रत मिळणेबाबतची संपूर्ण माहिती जिल्हा कृषी अधिक्षक यांचे कार्यालयात दि. २८/०४/२०१०, दि. २९/०४/२०१० व दि.३०/०४/२०१० ला गट 'ड' शिपाई भरतीच्या मुलाखती ठेवण्यात आल्या त्या संदर्भातील माहिती मागितलेली असून माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसते. माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दि.२३/०६/२०१० व दि.१४/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. दोनही अपीलांमध्ये प्रथम अपीलांचा सुध्दा निर्णय दिलेला नाही. त्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ती यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांना आजपर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. आज जनमाहिती अधिकारी हे हजर सुध्दा झाले नाहीत. असे असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतू शास्ती लादण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकणे बंधनकारक असल्यामुळे त्यांना कारणे दाखवा असे आदेश काढणे आवश्यक आहे त्याकरीता अपीलकर्ती यांचे अपील क्र. ११८७/नाग/२०१० व ११८८/नाग/२०१० ही दोनही अपीले ही मंजूर करण्यास पात्र आहेत.

# आ दे श

१. अपीलकर्ती यांचे अपील क्र. ११८७/नाग/२०१० व अपील क्र. ११८८/नाग/२०१० ही दोनही अपीले मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत त्यांच्या दोनही अर्जातील माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ती यांच्या दोनही अर्जाच्या संदर्भात विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रु. १०००/- ची शास्ती कां लादण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत आयोगापुढे करावा. खुलासा न केल्यास त्यांचेविरुध्द शास्ती कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ११६१/नाग/२०१०</u>**
**<u>अपील क्र. ११६२/नाग/२०१०</u>**

१. श्री रामदास एम. मासुरकर - **अपीलकर्ता**
हिवरी म्हाडा वसाहत, हिवरी नगर, नागपूर
ता. जि. नागपूर - ८

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी - **उत्तरवादी**
नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नागपूर
ता. जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नागपूर
ता. जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक ०१/०९/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी अनुक्रमे द्वितीय अपीलं क्र. ११६१/नाग/२०१० दि. २८/०७/२०१० रोजी व द्वितीय अपील क्र. ११६२/नाग/२०१० दि. ०६/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल केली आहेत. या दोनही अपीलांमध्ये अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता उशिरा उपस्थित झाले. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्र. ११६१/नाग/२०१० व अपील क्र. ११६२/नाग/२०१० या दोनही द्वितीय अपीलांमध्ये अपीलकर्ता यांनी दि. ३०/०८/२०१० रोजी माहिती मिळाली अशी पोच दिलेली आहे. त्यामुळे सदरची दोनही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ११६१/नाग/२०१० व अपील क्र. ११६२/नाग/२०१० ही दोनही अपीले खारीज करण्यात येतात.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

# मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

## अपील क्र. ११६०/नाग/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. राजमल रतनलालजी दलाल (राठी)<br>जगदिश कुंज, १८ हिवरी ले आऊट, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता<br>नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (नियमितीकरण)<br>नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०१/०९/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०२/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. सारंग नेरकर उपस्थित आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ११/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे पुढील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

Construction on Plot No. 24-A & 24 in Kh. No. 22, Mouza Hiwari, C.T.S. No. 774 & 773 respectively sheet No. 313, Ward No. 33 (Old), 96 (New). Padole Nagar / Hiwari Nagar Co-Operative Society.

A) Whether Constrcutions on Plot Nos. 24 & 24 -A as above are sanctioned one, if yes, Please provide copy of Sancitoned Map & Building Permit.

B) If construction is not sanctioned, what action initiated / taken for demolition / removal thereof and please provide documents & details thereof.

C) Whether Plot Nos. 24 & 24-A are sanctioned & whether they are regularized, provide documents.

D) Whether at any time, any complaint for prosecution for illegal/ unauthrorised construction if any on Plot Nos. 24 & 24 -A was lodged. If yes, please give details thereof.

E) What is the extent (area) of construction on Plot Nos. 24 & 24-A, respectively.

सदर माहितीचा कालावधी हा २००१ ते २०१० हा असून माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि. २६/०५/२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. २१/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलामध्ये त्यांनी त्यांच्या अर्जातील 'D' या मुद्याची माहिती मिळाली नाही असे कारण दिलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. १३/०७/२०१० रोजी देण्यात आला असून इमारत अभियंता (पूर्व) तथा सहाय्यक माहिती अधिकारी व विभागीय अधिकारी (पूर्व) तथा सहाय्यक माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जावून संबंधीत धारिकेचे निरिक्षण करावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. सारंग नेरकर यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांना इतर मुद्यांची माहिती मिळालेली आहे. परंतू 'D' या मुद्याची माहिती मिळालेली नाही. व प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा त्या बाबत काहीही उल्लेख करुन दिलेला नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाला सांगितले की,

अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे धारिकेचे निरिक्षण केले व धारिकांच्या निरिक्षणानंतर अपीलकर्ता यांनी FIR ची प्रत व निर्णयाच्या प्रतची मागणी केली होती. सदरच्या FIR ची व निर्णयाची प्रत कार्यालयात उपलब्ध नसल्याने पोलीस निरिक्षक कोतवाली यांनी अर्जदारास मागितलेली माहिती पुरविण्या बाबत दि. २६/०८/२०१० रोजी पत्राने मागविण्यात आलेली आहे. व ती प्राप्त झाल्यावर अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येईल. सदरचा गुन्हा हा M.R.T.P. कायद्यांतर्गत दि. ०६/१२/२००६ रोजी दाखल करण्यात आला होता व FIR नं. ३३२६/२००६ हा आहे. गुन्ह्याचा फैसला दि. ०७/०३/२००९ रोजी झाला आहे व ही बाब अपीलकर्ता यांनीच जनमाहिती अधिकारी यांचे निदर्शनास आणली. यावरुन त्यांना या सर्व प्रकरणाची माहिती असून सुध्दा त्यांनी FIR ची व निर्णयाच्या प्रतची मागणी केलेली आहे. परंतू धारिकेत ती उपलब्ध नसल्यामुळेच किंवा FIR च्या संदर्भात धारिका स्वतंत्र असल्यास ती आढळून आली नाही. त्यामुळे पोलीस स्टेशन मधून सदरची प्रत मागवून ती उपलब्ध करुन देण्याचे पत्र दिले आहे व ती उपलब्ध झाल्यावर अपीलकर्ता यांना पुरविण्यात येईल. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी पोलीस स्टेशन कडून दाखल झालेली FIR ची प्रत व निर्णयाची प्रत उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना विनामुल्य पुरविण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**
**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ११७५/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती जयश्री कर्सलजी मस्के (आरोग्य सेविका)<br>उपकेन्द्र कोथूर्णा, प्रा. आ. केन्द्र मोहदुरा<br>ता. जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका आरोग्य अधिकारी<br>पंचायत समिती भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी<br>प्राथमिक आरोग्य केन्द्र, मोहदुरा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**<u>अपील क्र. ११७६/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी<br>जिल्हा परिषद भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ५. | जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/०९/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते.

अपील क्र. ११७५/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. अपील क्र. ११७६/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे प्रशासकीय अधिकारी श्री एस. पी. तुरकर हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्र. ११७५/नाग/२०१० मध्ये दि.१२/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केन्द्र मोहदुरा जि. भंडारा यांचे कार्यालयात वैद्यकीय रजेचा पगार बील व कर्तव्य कालावधीचे वेतन केव्हा मिळणार यासंबंधी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. ०७/०४/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतू अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. १७/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. ०९/०६/२०१० रोजी देण्यात आला परंतू अपीलकर्ता यांनी स्वाक्षरी करण्यास नकार दिलेला आहे. तरीसुध्दा अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलकर्ती यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, माहिती मिळाली आहे परंतू ती त्यांना अपूर्ण दिली आहे. त्यांना वेतन मिळाले नाही असे सांगितले असता त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र मोहदुरा येथे अपीलकर्ती यांना रुजु होण्यास सांगितले असता तसा रुजु अहवाल सादर न करता विनापरवानगी त्या परस्पर निघुन गेल्या अशा प्रकारे त्या उपस्थित राहत नाही, विनापरवानगी निघून जातात अहवाल सादर करीत नाही, कागदपत्रे सादर करीत नाही, कार्यालयात असून सुध्दा कार्यालयातील पत्रे घेत नाहीत, त्यामुळेच त्यांचे वेतनाचे धनादेश तयार असुन सुध्दा त्या घेत नाही. अशी खालीलप्रमाणे माहिती जनमाहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र मोहदुरा यांनी दिली आहे.

## १) वैद्यकीय कालावधीच्या वेतनाबाबत

आपण प्रथम दि. २४/०६/२००९ ते दि. २३/०७/२००९ पर्यंत एकूण ३० दिवस वैद्यकीय रजेवर होते. परंतु रजेवर जाण्यापूर्वी आपला वैद्यकीयदृष्ट्या अकार्यक्षम असण्याबाबत प्रमाणपत्र ह्या कार्यालयास सादर केलेले नव्हते. तसेच दि. २४/०७/२००९ ला आपण ह्या कार्यालयात कामावर रुजु होण्याबाबतचे अर्ज देतांना खाजगी डॉक्टरांचे दि. २४/०६/२००९ ते दि. २३/०७/२००९ पर्यंतचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले त्यानंतर दि.२५/०७/२००९ ला १ दिवसाचे किरकोळ रजेचे अर्ज मंजूर न करता अर्ज परस्पर श्री जि. बी. साखरवाडे आ. सहा. यांचे कडे दिला. व त्यानंतर तुम्ही सादर केलेल्या दि. २८/०७/२००९ च्या अर्जानुसार आपण परत वैद्यकीय दृष्ट्या अकार्यक्षम प्रमाणपत्र न जोडता दि. २८/०७/२००९ पासून सेवेत हजर राहू शकत नाही असे कळविले. संबंधीत कालावधीचा खाजगी डॉक्टरकडून दि. २८/०७/२००९ ते दि. २२/१०/२००९ पर्यंतचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले संबंधीत कालावधी ८७ दिवसांचा असल्याने व खाजगी डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले असल्याने आपणास दि. २३/१०/२००९ सादर केलेल्या आपल्या अर्जात मा. जिलहा शल्य चिकित्सक किंवा मेडिकल बोर्ड नागपूर यांचेकडून कार्यक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र आनावयास सांगितले. त्यानुसार आपण दि.०४/१०/२००९ ला सादर केलेल्या मा. जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या प्रमाणपत्रानुसार दि. ०३/११/२००९ ला कामाकरिता सक्षम असल्याचे कळले. तसेच दि. २३/१०/२००९ ते दि. ०२/११/२००९ पर्यंतचे आपले वैद्यकीय दृष्ट्या कार्यक्षम असल्याचे किंवा अकार्यक्षम असल्याचे कोणतेही प्रमाणपत्र सादर केलेले नाही. तसेच सदर कालावधीतील रजेच्या मंजुरीकरिता विहीत प्रपत्रात न.१ मध्ये माहिती ह्या कार्यालयास सादर केलेली नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता वरील कालावधीची वैद्यकीय रजा मंजूर करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर बाबींचे निराकरण झाल्यानंतरच वैद्यकीय रजा मंजूर करण्यात येवून सदर कालावधीच्या वेतन नियमानुसार काढण्याची कार्यवाही करण्यात येईल.

## २) कर्तव्य कालावधीच्या वेतनाबाबत

आपण मागितलेल्या माहितीनुसार दि. २३/१०/२००९ ते दि. २८/०२/२०१० चे कर्तव्य कालावधीचे वेतन बाबत आपणास माहिती देण्यात येते की, मा. जि. शल्य चिकित्सक यांच्या वैद्यकीय प्रमाणपत्रानुसार आपण दि.०३/११/२००९ ला कार्यक्षम असल्याचे कळले तरी वैद्यकीय दृष्ट्या अकार्यक्षम असतांना आपण दि.२३/१०/२००९ ते दि. ०२/११/२००९ चे वेतन कर्तव्य कालावधी संबोधून वेतन मागणे नियमबाहय वाटते.

तसेच वरील सर्व बार्बीचा विचार करता आपणास दि. ०४/११/२००९ ला मा. जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद भंडारा येथे रुजु होण्याबाबत मार्गदर्शनाकरीता पाठविले होते. सदर मार्गदर्शनाबाबतचे पत्र आपण दि. १७/११/२००९ ला ह्या कार्यालयास सादर केले. मा. जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांच्या पत्रानुसार आपण दि. १६/११/२००९ ला प्राथमिक आरोग्य केंद्र मोहदुरा येथे रुजु करण्यात यावे असे कळविले होते. त्यानुसार आपणास रुजु होण्याबाबत सांगितले असता तसा रुजु अहवाल सादर न करता विनापरवानगी परस्पर निघुन गेले. त्यानंतर आपणास वारंवार रुजु अहवाल तोंडी व उपकेंद्र भेटीत सादर करण्याबाबत सांगण्यात आले. परंतू त्याबाबत आपण कोणताही रुजू अहवाल अजुनपर्यंत विहीत नमुन्यात ह्या कार्यालयास सादर केलेला नाही.

संबंधीत कालावधीचा दिनांक १६/११/२००९ ते दि. २८/०२/२०१० ह्या कालावधीतील केलेल्या कामाचा संपूर्ण अहवाल (राष्ट्रीय कार्यक्रम सर्व) तसेच दौरा दैनंदिनी अजुनपर्यंत ह्या कार्यालयास सादर केलेला नाही. ह्याबाबत आपणास दि. ११/०३/२०१० ला अहवाल सादर करण्याबाबत पत्राद्वारे कळविण्यात आलेले होते तरी सदर कालावधीचा आपण नमूद केलेल्या दिनांकानुसार दि. २३/१०/२००९ ते दि. २८/०२/२०१० ह्या कालावधीतील संपूर्ण अहवाल सादर केल्यानंतर संबंधीत कालावधीचा वेतन काढण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा दि. ३०/०८/२०१० अन्वये खालीलप्रमाणे खुलासा दिलेला आहे.

अर्जदार श्रीमती जे. के. मस्के आरोग्य सेविका उपकेंद्र कोथुर्णा, प्राथमिक आरोग्य केंद्र मोहदुरा, जिल्हा भंडारा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि. १२/०३/२०१० कार्यालयीन प्राप्त दि.१७/०३/२०१० (आ. क्र. ५२/२०१०) ला वैद्यकीय रजेचे पगार बिल व कर्तव्य कालावधीचे वेतन केव्हा मिळणार याची प्रमाणित प्रत मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला होता. त्यानुसार माहिती पुरविण्याकरीता लागणारा दस्ताऐवजांचा खर्च पुरविण्याबाबत दि. ०३/०४/२०१० जा. क्र. ६९/२०१० ला पत्र देण्यात आले होते. परंतू सदर पत्रात अपीलकर्त्याने त्याच्या कोणत्या दिनांकित पत्राचे संबंधी माहिती देण्यात येत आहे. याचा खुलासा

नसल्याचे सांगून मा. वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र मोहदुरा यांना दि. ०७/०४/२०१० रोजी कार्यालयीन प्राप्त दि. ०९/०४/२०१० (आ. क्र. ७३/२०१०) ला लेखी कळविले.

सदर आक्षेपानुसार दि. १२/०४/२०१० आव. क्र. ७५/२०१० अपीलकर्ता यांना पैसे भरण्याबाबत लेखी कळविण्यात आले. सदर पत्र अपीलकर्त्याला दि. २०/०४/२०१० ला मिळाल्याचे त्यांच्या पत्रावरील स्वाक्षरीवरुन कळते. पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे. अपीलकर्ता दि. ०७/०४/२०१० जा.क्र. ७२/२०१० ला लेखी स्वरुपात शिघ्र टपालाद्वारे माहिती वेळेचे आत देण्यात आलेली आहे. अर्जदाराने रुजु होते वेळी वैद्यकीय प्रमाण पत्रासोबत इतर आवश्यक कागदपत्र सादर न करता कामावर रुजु झाले त्यामुळे त्यांची दि. २४/०६/२००९ ते २२/१०/२००९ पर्यंतची वैद्यकीय रजा मंजूर करण्यात आलेली नाही. व त्या कालावधीचे वेतन काढण्यात आले नाही. तसेच अर्जात नमुद केल्याप्रमाणे दि.२३/१०/२००९ ते दि. २८/०२/२०१० मधील कर्तव्य कालावधीत केलेल्या कामाचा मासिक अहवाल आज पावेतो अप्राप्त आहे. ही बाब अपीलकर्त्याने स्वत: वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य कें द्र मोहदुरा दि. २३/०४/२०१० ला दिलेल्या पत्रात लिखीत स्वरुपात मान्य केलेली आहे, त्यामुळे सदर कालावधीचे वेतन काढण्यात आलेले नाही.

श्रीमती जे. के. मस्के आरोग्य सेविका उपकेंद्र- कोथूर्णा, प्रा.आ.केंद्र मोहदुरा, ह्या दि. २४/०६/२००९ ते दि. २२/१०/२००९ पर्यंत अनाधिकृत रित्या गैरहजर होत्या या पूर्वी त्यांनी वैद्यकीय अधिकारी प्रा.आ.केंद्र मोहदुरा यांनी मागितलेला अहवाल तसेच एनआरएचएम अंतर्गत मागितलेल्या खर्चाचा अहवाल सादर केलेला नव्हता त्यांचे विरुध्द स्थानिक लोक प्रतिनिधी व मा. जिल्हा परिषद सदस्य यांच्या तक्रारी होत्या तक्रारी मध्ये मुख्यालयी न राहणे, ग्रामिण जनतेशी अरेरावी पणे वागणे, ग्रामस्थांना आरोग्य सेवा न पुरविणे इ. कारणे नमूद केलेले आहेत. तसेच सहकारी कर्मचाऱ्यांशी उध्दटपणे वागणे, वरीष्ठांच्या आदेशाची अवहेलणा करणे व अरेरावी पणाचे उत्तर देणे ह्या सर्व बाबींमुळे मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद भंडारा यांचे पत्र क्र. भंजिप/आवि/स्थ४/वाशी/४८१८/०९, कार्यालय जि. आ. अ. जि. प. भंडारा दि. १४/१२/२००९ नुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्यासंबंधाने जोडपत्र १ ते ४ विहीत नमुन्यात भरुन वरीष्ठ कार्यालयात सादर केलेला असून प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.

वरील सर्व बाबींमुळे वरीष्ठांचे लक्ष विचलीत करणे व हेतु परस्पर त्रास देण्याच्या उद्देशाने कोणतीना कोणती माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागुण कार्यालयास वेठीस धरण्याचा प्रयत्न करतात.

अर्जदारानी एकाच बाबीवरील माहिती वैद्यकीय अ. प्रा. आ. केंद्र मोहदुरा मा. तालुका आरोग्य अधिकारी, पं. स. भंडारा व मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. भंडारा यांच्याकडे माहिती मागितली वैद्यकीय अधिकारी यांनी पुरविलेली माहिती प्रत्येक वेळेस अपूर्ण व असमाधानकारक आहे. असे संबोधून हेतू परस्पर त्रास देण्याच्या उद्देशाने अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील केली आहे.

या पूर्वी दि. ३०/०३/२०१० ला तालुका कार्यालयात झालेल्या अपीलात अपीलकर्ता यांची भुमिका संपूर्ण पणे असमाधान कारक होती व वै. अ. प्रा. आ. केंद्र मोहदुरा यांनी पुरविलेली माहिती योग्य होती. व वेतनासंबंधी शहानिशा करण्याबाबत तोंडी आदेश मा. तालुका अरोग्य अधिकारी यांचे कडून वै. अ. यांना दिले व पत्र क्र. ५९/२०१० दि. ०२/०६/२०१० रोजी लेखी स्वरुपात कळविण्यात आलेले होते. तसेच दि. ०९/०६/२०१० ला ता.आ.अ. कार्यालयात झालेल्या अपीलात स्वाक्षरी करण्यास नकार दिला. तसेच विचारलेल्या बाबींवर बोलण्यास स्पष्ट नकार दिला.

यावरुन मा. महोदय, श्रीमती जे.के. मस्के यांनी वेळोवेळी मागितलेली माहिती वेळेच्या आत पुरविण्यात आलेली असून सुध्दा जाणूनबुजून त्रास देण्याच्या हेतुने पुन्हा पुन्हा त्याच माहितीची मागणी केलेली आहे.

५. वरील सर्व बाबींचा विचार करता अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाल्यामुळे, परंतू त्यांच्या वेतनाची माहिती माहितीच्या अधिकारात मान्य करता येत नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

६. अपील क्र. ११७६/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दि. २५/०१/२०१० रोजी कु. वैशाली लालाजी राघोते (ANM) कंत्राटी उपकेंद्र - कोथुर्णा यांचे विरोधात अर्जदाराने दिनांक १६/०६/२००९ रोजी तक्रार अर्ज दाखल केला होता. त्या तक्रार अर्जा संदर्भात काय कार्यवाही केली, अशी माहिती त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालयात मागितलेली दिसून येते.

७.	अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. ०८/०२/२०१० ला माहिती पुरविण्यात आली. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. ०६/०४/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १०/०५/२०१० रोजी पोस्टाद्वारे पाठविण्यात आला आहे. परंतू समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

८.	अपीलकर्ती यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या दि. १६/०६/२०१० च्या तक्रारी वरील झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही . परंतू जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना ती कार्यवाही उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले. तसेच श्रीमती जयश्री मस्के आरोग्य सेविका दि.२४/०६/२००९ पासून दि. २२/१०/२००९ पर्यंत विना परवानगी गैरहजर होत्या यापूर्वी त्यांनी जननी सुरक्षा या योजनेचा हिशोब वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र मोहदुरा यांना सादर केलेला नव्हता. त्यांच्या विरुध्द स्थानिक लोकप्रतिनिधीनी व मा.जिल्हा परिषद सदस्य यांनी तक्रारी केलेल्या होत्या. त्यांचे तक्रारींमध्ये कार्यालयात उपस्थित न राहणे, ग्रामिण जनतेशी अरेरावीने वागणे, ग्रामस्थांना आरोग्य सेवा न पुरविणे इत्यादी कारणे नमुद केली होती. त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दि. ०५/०७/२०१० चे आदेशान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. श्रीमती मस्के यांना वेळोवेळी माहिती पुरविण्यात आली असून सुध्दा त्यांनी कार्यालयास जाणूनबुजून व हेतु परस्पर पुन्हा - पुन्हा त्याच माहितीची मागणी केलेली आहे. अर्जदाराने सारखीच माहिती वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ. केन्द्र मोहदुरा व तालुका आरोग्य अधिकारी, भंडारा यांचेकडून मागीतलेली होती. ती माहिती संबंधीतास वेळीच पुरविण्यात आलेली आहे असेही आयोगाच्या निदर्शनास आणले.

९.	वरील सर्व युक्तिवादावरुन अपीलकर्ती ह्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींचा गैरवापर करीत आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ती यांचे द्वितीय अपील क्र. ११७५/नाग/२०१० व द्वितीय अपील क्र. ११७६/नाग/२०१० ही दोनही अपीले खारीज करण्यात येतात.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. ११७७/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री महेन्द्रकुमार भिवाजी नंदागवळी<br>वैशाली नगर, खात रोड, भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक<br>कस्तुरबा गांधी विद्यालय, बेलगांव, भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/०९/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०३/२०१०, दि. १७/०३/२०१० व दि. ६/०४/२०१० अशा अनेक अर्जाच्या माध्यमातून माहिती मागितलेली दिसून येते. त्या संदर्भात एकच प्रथम अपील दाखल केले व एकच द्वितीय अपील दाखल केले. परंतू त्यांच्या इतर अर्जांचा विचार त्यासोबत करता येत नाही. त्यामुळे त्यांना कोणत्या अर्जासंबंधी सुनावणी देणे आहे असे विचारले असता दि. १७/०३/२०१० च्या अर्जाच्या संदर्भात सुनावणी घ्यावी असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

अपीलकर्ता यांना शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) यांचेकडे दि. १७/०३/२०१० रोजी सन १९९३ ते २००२ पर्यंत कस्तुरबा गांधी विद्यालय बेलगांव (मांडवी) या शाळेचे वर्धीत मान्यताचे सत्य प्रमाणित प्रत मागितलेली दिसून येते. सदरची माहिति व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि. २६/०४/२०१० रोजी आपला मुद्या क्र. ३ नुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद भंडारा यांचे पत्र दि. १९/०३/२०१० च्या आदेशानुसारच आपणास वर्धीत मान्यतेच्या सन १९९३ ते २००० पर्यंतच्या प्रती पाठविण्यात आल्या आहेत. पाठविलेल्या प्रतीत खाडाखोड केल्याचा आरोप साफ खोटा असून शाळेला मान्य नाही याची शहानिशा संबंधीतांकडून करावी असे नमूद केलेले दिसते. परंतू त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही व त्यांनी दि. १०/०५/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०७/०७/२०१० रोजी देण्यात आला असून अर्जदाराने जी माहिति मागविली होती त्या संपूर्ण माहितीमध्ये खाडाखोड होती त्याची स्वच्छ प्रत मुख्याध्यापकाने दाखविली व समाधान केले. तसेच इतर कर्मचाऱ्यांची माहितीची मागणी केली असता सदर माहिती कर्मचाऱ्यांच्या परवानगी शिवाय पुरविता येत नाही असे मुख्याध्यापकाने सुनावणीमध्ये सांगितले व तसे कर्मचाऱ्यांनी मुख्याध्यापक यांना लिहुन दिलेले आहे. त्यामुळे आपणांस आवश्यक असलेले कागदपत्र सुनावणीच्या वेळी मुख्याध्यापकाने पुरविलेले आहे. त्यामुळे सदर निर्णय अंतिम देवून फाईल करण्यात येत आहे, असा निर्णय दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांना शाळेचे वर्धीत मान्यतेच्या संदर्भात ज्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिल्या आहेत त्यात खाडाखोड आहे व खाडाखोडी वर सही सुध्दा केलेली नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये स्वच्छ प्रत मुख्याध्यापकाने दाखविली असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिल्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिति उपलब्ध करुन दिलेली आहे ती खाडाखोड करुनच उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांचे मत आहे. अपीलकर्ता यांनी माहिति शिक्षणाधिकारी यांना मागितली होती. शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात माहिति उपलब्ध असल्यामुळे प्रतीवरुन माहिति उपलब्ध करुन देणे

आवश्यक होते परंतू ती त्यांनी दिली नाही. त्यामुळे शिक्षणाधिकारी ( माध्यमिक विभाग) यांचे कार्यालयातील उपलब्ध प्रतीशी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या छायांकित प्रतींची पडताळणी करुन माहिती ही खाडाखोड करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयातील वर्धीत मान्यतेच्या छायांकित प्रती सही व शिक्क्यानिशी देणे संयुक्तिक राहील त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत प्रथम अपीलीय अधिकारी यांना कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून उपस्थित रहावे व त्यांचेकडील वर्धीत मान्यतेच्या छायांकित प्रती ह्या प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) यांचेकडे सादर करुन शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असलेल्या मूळ प्रतींची पडताळणी करुन स्वच्छ प्रती च्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्या त्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) यांनी प्रमाणित करावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

## अपील क्र. ११९९/नाग/२०१०

१. श्री देवेंद्र सुरेश ब्राम्हणवाडे - **अपीलकर्ता**
मु. पो. कनेरी
ता. जि. गडचिरोली

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. सब डिव्हिजन, गडचिरोली
C/o, बट्वार ईमारत, चामोर्शी रोड, ता.जि. गडचिरोली

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता - **उत्तरवादी**
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. गडचिरोली
C/o, बट्वार ईमारत, चामोर्शी रोड, ता.जि. गडचिरोली

## अपील क्र. १२००/नाग/२०१०

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मदाय आयुक्त गडचिरोली
ता. जि. गडचिरोली

५. जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष - **उत्तरवादी**
शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, गडचिरोली
ता. जि. गडचिरोली

**(आदेश पारित दिनांक ०४/०९/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी अपील क्र. ११९९/नाग/२०१० व अपील क्र. १२००/नाग/२०१० ही दोन द्वितीय अपीले दि. ०२/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०४/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपील क्र. ११९९/नाग/२०१० मध्ये अपीलकर्ता हजर आहेत.

उत्तरवादी हजर आहेत. अपील क्र. १२००/नाग/२०१० अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, गडचिरोली हे हजर असून त्यांचे वतीने ॲड. भूरे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपील क्र.११९९/नाग/२०१० मधून दि. २८/०४/२०१० ला सहाय्यक अभियंता बां.स.व.सु. उपविभाग, म. रा. वि. वि. कं. मर्या. गडचिरोली यांचेकडे मौजा आलापल्ली येथील शेतीला जलसिंचनासाठी डिमांड रिफंड करण्यासाठी केलेल्या दि. १६/०९/२००९ ला केलेल्या अर्जाची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही दिनांक १८/०५/२०१० रोजी श्री नानाजी बाबाजी वऱ्हाडे यांच्या संदर्भातील असल्यामुळे त्यांना सदरची माहिती मिळालेली आहे आणि रु १५००/- चा रिफंड पण मिळालेला आहे. तसेच त्यांनी पोच दिलेली असून त्यावर देवेन्द्र सुरेश ब्राम्हणवाडे असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

३. अपील क्र. १२००/नाग/२०१० अपीलकर्ता यांनी दि. १५/०४/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ गडचिरोली माजी प्राचार्य बी. एम. नरड ॲड एन. एस.गंगुवार शिक्षण महाविद्यालय गडचिरोली यांचे काळातील माहिती मिळणेबाबत खालीलप्रमाणे एकूण ७ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती पंजीबध्द टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

१. सन २००१ ते २००५ पर्यंत संस्थेला किराया पोटी दिलेल्या पावत्यांची तसेच कॅश बुकची झेरॉक्स प्रत.

२. बी. एड कॉलेज इमारत बांधकामावर खर्चाची रक्कम किती ? तसेच मुल्यांकन प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत.

३. एफ डी. आर. सन २००४ ते २००७ पर्यंतची झेरॉक्स प्रत.

४. दि. १०/०१/२००१ ची कॅश बुकची झेरॉक्स प्रत.

५. दि. ०८/०२/२००२ ची कॅश बुकची झेरॉक्स प्रत.

६. माहे जाने २००३ च्या संपूर्ण महिन्याची कॅश बुकची झेरॉक्स प्रत.

७. संस्थेला उसणवार दिलेली रक्कम किती ? परत किती केलेली आहे त्या वर्षाच्या कॅश बुकची झेरॉक्स प्रत.

४. माहिती अर्जाच्या अनुषंगाने अध्यक्ष, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ गडचिरोली यांनी दि. १५/०५/२०१० रोजी, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ गडचिरोली हे बॉम्बे पब्लीक ट्रस्ट अंतर्गत नोंदणीबध्द आहे. तेव्हा संस्थेला माहिती अधिकाऱ्याची नियुक्ती नाही. माहितीचा अधिकार सार्वजनिक न्यासाला लागू असल्याबाबत आपण अर्जासोबत पुरावा दाखल केला नाही. माहितीचा अधिकार सार्वजनिक न्यासाला लागू आहे काय ? असल्यास त्याबाबत शासन परिपत्रक किंवा निर्णयाच्या प्रती संस्थेला सादर कराव्यात, असे अपीलकर्ता यांना कळविले. परंतू त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दि. २८/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ३०/०६/२०१० रोजी देण्यात आला असून अपील फेटाळण्यात आले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, ते स्वतः भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन तालुका उपाध्यक्ष आहेत व संस्थेत भ्रष्टाचार भरपूर आहे त्याबाबतची माहिती त्यांनी संस्थेकडे मागितली होती. परंतू संस्था ही बाम्बे पब्लीक ट्रस्ट कडे नोंदणीबध्द असल्यामुळे संस्थेला अधिनियमाच्या तरतुदी लागू होतात काय ? असे विचारले आहे. त्यावर संस्थेचे वकील श्री एम. एल. भुरे यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, संस्था ही बॉम्बे पब्लीक ट्रस्ट प्रमाणे पंजीबध्द असल्यामुळे मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांनी श्री भास्करराव कुळकर्णी विरुध्द राज्य माहिती आयोग नागपूर यांचे माहितीत दिलेल्या निर्णयानुसार याचिकेप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी संस्थेस लागू होत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. परंतू सदरच्या याचिकेतील निर्णय हा एका धार्मिक मठाबद्यलचा निर्णय आहे व माहिती ही शिक्षण संस्थेबद्यल आहे. बॉम्बे पब्लिक ट्रस्ट खाली अनेक प्रकारचे न्यास हे पंजीबध्द होत असतात परंतू प्रत्येक न्यासाचे उद्येश व स्वरुप भिन्न असते याचिकेतील न्यास हे धार्मिक मठ आहे व त्यास शासनाचा निधी उपलब्ध नाही त्यामुळे मा. उच्च न्यायालयाने परिच्छेद ८ मधील निर्णय देतांना ज्यांना सार्वजनिक न्यासाकडून

माहिती हवी असेल त्यांनी त्या सार्वजनिक न्यासास शासनाकडून अनुदान मिळते हे सिध्द करावे लागेल असे सुध्दा म्हटले आहे. काही शिक्षण संस्थेस, शाळा किंवा महाविद्यालये मंजूर करतांना शासनाकडून अनुदान प्राप्त होते. त्यामुळे शैक्षणिक संस्था ही सार्वजनिक विश्वस्त संस्था असली तरी, शासनाचे अनुदान प्राप्त असेल तर ती माहितीचा अधिकार अधिनियम २ (ज) मधील 'सार्वजनिक प्राधिकरणाच्या' व्याख्येत समाविष्ट होते. व ज्या शैक्षणिक संस्थेस विना अनुदानित शाळा किंवा महाविद्यालये मंजूर करण्यात आली आहेत अशी शैक्षणिक संस्था म्हणजेच विश्वस्त संस्था. ही मा. उच्च न्यायालय खंडपीठ मुंबई च्या दुसऱ्या याचिकेच्या प्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीतील सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत येत नाही. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेस महाविद्यालयाकरीता शासनाचे अनुदान प्राप्त आहे किंवा नाही हा मुद्दा निर्णयासाठी आवश्यक आहे. त्यावर अध्यक्ष शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ यांना मागितलेली माहिती ही विना अनुदानीत शाळांविषयीची आहे. तसेच अपीलकर्ता हे त्याच महाविद्यालयात चपराशी आहेत व त्यांनी सुध्दा सदरच्या शाळेस अनुदान मिळत नाही हे मान्य केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.

## अपील क्र. १२५८/नाग/२०१०

१. श्री जगन्नाथ बळवंतराव दलदले - **अपीलकर्ता**
प्लॉट क्र.१२, अयोध्यानगर बस स्टॉप, न्यु सुभेदार रोड गल्ली क्र.-३, नागपूर
ता. जि. नागपूर -४४० ०२४

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी - **उत्तरवादी**
रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय मौदा
ता. मौदा जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक १७/०९/२०१०)**

## नि र्ण य

१. अपीलकर्ता यांनी दि. २०/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २५/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय मौदा यांचेकडे शासकीय अधिकारी यांना नेमून दिलेल्या मुख्यालयी न राहण्याबाबत एकूण १४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

त्यात त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचे मत सुध्दा मागितले आहे. परंतू विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. ०९/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय देण्यात आला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. २८/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय मौदा यांनी आपण मागितलेली माहिती प्रश्नोत्तर स्वरुपाची आहे. आपण स्वतः व्यक्तीशः हजर राहून आपणास पाहिजे असलेली माहिती रुपये २/- प्रती प्रमाणे रेकॉर्डची तपासणी करुन मिळेल. सबब आपला अर्ज नस्ती करण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतू त्यामध्ये दि. ३०/०४/२०१० रोजीचा माहितीच्या अर्जाचा संदर्भ दिलेला आहे.

अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे की, त्यांनी दि. ३०/०४/२०१० रोजी कोणताही अर्ज केलेला नाही दि. ०९/०७/२०१० रोजी जे प्रथम अपील दाखल केले आहे त्यात प्रथम अपील करण्याची शेवटची तारीख २४/०७/२०१० अशी नमूद केली आहे. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांना कोणतीही माहिती स्पष्ट नसल्यामुळे त्यांनी चौकशीचा अर्थ लावलेला आहे. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भात त्यांना उत्तर देणे आवश्यक आहे. अव्वल कारकून यांनी तहसिलदार यांना ज्या प्रमाणे मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तशीच मुद्येनिहाय माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

४. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींप्रमाणे माहिती जशी उपलब्ध असते तशीच ती कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध होते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांचे मत सुध्दा मागितले आहे. वास्तविकपणे अपीलकर्ता यांना तक्रार करावयाची आहे असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी संबंधीत अधिकाऱ्यांकडे अर्ज करुन चौकशी केली असती व त्या तक्रारीच्या चौकशी नंतर माहितीच्या अधिकारात माहिती मागणे संयुक्तिक झाले असते. असे असले तरी अव्वल कारकून यांनी तहसिलदार यांना कळविल्याप्रमाणे, व जी माहिती कागदपत्रांच्या

प्रतींच्या स्वरुपात उपलब्ध आहे ती तशीच कागदपत्रांच्या स्वरुपात अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांचे दि.२५/०५/२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध असल्यास किंवा नसल्यास कागदपत्रांच्या स्वरुपात विनामुल्य मुद्येनिहाय उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत द्वितीय अपील.**

**<u>अपील क्र. ९०३/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री समीर श्रीधर पालकर<br>रा. रामेश्वरी बस स्टॉपच्या मागे, गल्ली नं. २, पार्वती नगर,<br>नागपूर - ४४० ०२७ | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु द्ध** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक<br>महाराष्ट्र मत्स्य उद्योग विकास महामंडळ मर्या.<br>एन.के.एम. इंटरनेशनल रिक्लेमेंशन, चिनॉय मार्ग, मुंबई -२० | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>महाराष्ट्र मत्स्य उद्योग विकास महामंडळ मर्या.<br>एन.के.एम. इंटरनेशनल रिक्लेमेंशन, चिनॉय मार्ग, मुंबई -२० | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १७/०९/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २९/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०३/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०/०७/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. दि. ३०/०७/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांनी शासकीय कामात व्यस्तता असल्याचे दर्शवून सुनावणीची पुढील तारीख देण्याची विनंती केली आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सुनावणीची पुढील तारीख ३०/०८/२०१० देण्यात आलेली आहे. दि. ३०/०८/२०१० रोजी अपीलकर्ता हजर असून त्यांचे वतीने ॲड. चांदूरकर उपस्थित आहेत. उत्तरवादी यांचे तर्फे मंडळाचे माहिती अधिकारी श्री वि. म. देशपांडे प्रकल्प व्यवस्थापक हे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे शासकीय कामकाजात व्यस्त असल्याने त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना प्राधिकृत केल्याचे पत्र दिले आहे. तसेच सदर प्रकरणी गैरअर्जदार तथा माहिती अधिकारी यांनी अर्जदारास मा. आयुक्तांच्या सुचनेनुसार माहिती दिली. माहिती तपासून त्यावर काही निवेदन

करावयाचे असल्यास पुढील दिनांक देण्याबाबत अपीलकर्ता यांनी मा. आयुक्त यांना तोंडी विनंती केली. त्यावरुन त्यांना सुनावणीची पुढील तारीख १७/०९/२०१० देण्यात आली आहे. दि. १७/०९/२०१० रोजी अपीलकर्ता यांचे वकील श्री चांदुरकर यांनी निवेदन दिले असून मुंबई येथे न्यायिक कामामुळे त्यांना उपस्थित राहणे आवश्यक असल्याने त्यांनी सुनावणीसाठी पुढील तारीख मागितलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र मत्स्य उद्योग विकास महामंडळ मुंबई यांचे पत्रानुसार शासकीय कामामुळे सचिवांकडील बैठकीस उपस्थित राहणे आवश्यक असल्याने ते गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०४/११/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाला राष्ट्रीय मत्स्यिकी विकास मंडळ कडुन मत्स्यबीजाचा साठवणुकी बाबत प्राप्त निधी सन २००७-०८ ते मे २००९ या कालावधीतील एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि. २३/११/२००९ रोजी अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. १७/१२/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. तत्पूर्वी अपीलकर्ता यांना दि. १६/११/२००९ रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. १२/०१/२०१० रोजी अपीलकर्ता यांना कागदपत्रांची पाहणी करण्यास आमंत्रीत करावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि. १३/०१/२०१० रोजी त्यांना पत्र दिलेले दिसून येते. दि. २२/०२/२०१० रोजी अपीलकर्ता व त्यांचे वकील यांचेसोबत चर्चा झाली त्यात अपीलकर्ता यांना हवी असलेली माहिती दिनांक २५/०३/२०१० पर्यंत देण्याचे ठरले व त्याप्रमाणे त्यांना कागदपत्रासहीत माहिती देण्यात आली. परंतू उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये सुनावणी झाली अपीलकर्ता यांना पुन्हा कागदपत्रे उपलब्ध करुन दिली त्यात सदरची कागदपत्रे तपासावी व त्याप्रमाणे निर्णय घ्यावा अशाप्रकारची विनंती केल्यामुळे अपीलकर्ता यांना मुदत देण्यात आली. परंतू अद्यापपर्यंत अपीलकर्ता यांच्या वकीलाने कागदपत्रांची तपासणी केलेली नाही व त्यांनी पुन्हा मुदत मागितलेली आहे. परंतू अशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाल्यानंतर

कागदपत्रे तपासण्याकरिता मुदत दिली जात नाही, संधी देवूनही कागदपत्रांची तपासणी केली नसल्यामुळे मुदतीचा अर्ज नाकारण्यात आलेला आहे. अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अधिनियमाचे कलम १८ (१) प्रमाणे तक्रार दाखल केली आहे. अशाप्रकारे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत द्वितीय अपील. अपील क्र. १२६९/नाग/२०१० अपील क्र. १२७०/नाग/२०१० अपील क्र. १२७१/नाग/२०१० अपील क्र. १२७२/नाग/२०१०.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री एच. एस. कनोजे<br>३७ बी, गांधी ले - आऊट, जाफर नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक<br>मलीक उर्दु हायस्कुल, ताजाबाद, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०९/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी अनुक्रमे अपील क्र. १२६९/नाग/२०१० दि. २४/०८/२०१०, अपील क्र. १२७०/नाग/२०१० दि. २६/०८/२०१०, अपील क्र. १२७१/नाग/२०१० दि. २५/०८/२०१० व अपील क्र. १२७२/नाग/२०१० दि. २३/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये चार द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदर सर्व अपीलांमध्ये अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी वरील सर्व चारही अपीलांमध्ये जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक मलिक उर्दु हायस्कुल ताजाबाद नागपूर यांना दि. २८/०५/२०१० च्या पत्रान्वये माहिती मागितलेली दिसते. अपील क्र. १२६९/नाग/२०१० मध्ये अफसाना बेगम मुस्ताक अहमद खान सहाय्यक शिक्षक मलीक ऊर्दु हायस्कुल ताजाबाद नागपूर या पदासाठी केलेला अर्ज शिक्षण, वय, अनुभव शिक्षणाधिकारी यांचे NOC मुलाखतीसाठी आलेल्या शिक्षकांची यादी त्यांचे शिक्षण, वय, अनुभव निवडसमितीमध्ये संस्थेचे पदाधिकारी, शिक्षण विभागाचे पदाधिकारी यांची यादी व निवड झालेल्या शिक्षकांची यादी, नेमणूकीचे आदेश शाळा समीतीचा ठराव, प्रस्ताव, शिक्षणाधिकारी यांचे अप्रुवल दिल्याचे पत्र, अशी माहिती मागितलेली आहे. अपील क्र. १२७०/नाग/२०१० मध्ये श्री शबीर सुलेमान घराडे शिपाई मलीक उर्दु हायस्कुल यांचे पगार दि.०१/०६/१९९० ते १९९१, १९९१ ते १९९२, १९९२ ते १९९३ पर्यंत काढलेल्या पगार बिलाची प्रत देणे बाबत माहिती मागितलेली आहे. अपील क्र. १२७१/नाग/२०१० मध्ये श्री निजामुद्यीन पूर्व मुख्याध्यापक मलीक उर्दु हायस्कुल यांनी बी. एड. करीता केलेला अर्ज. शाळेतर्फे अध्यक्ष मलीक उर्दु हायस्कुल यांचे शिफारस पत्र शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी मंजूर केले त्याची प्रत देणे. तसेच दि. ०१/०६/१९९० -९१, ९१-९२, ९२-९३ पर्यंत काढलेल्या पगार बीलाची प्रतची माहिती मागितली आहे. अपील क्र. १२७२/नाग/२०१० मध्ये रिझवरुल हक मुकदर हुसैन सौदागर सहाय्यक शिक्षक या पदासाठी केलेला अर्ज शिक्षण, वय, अनुभव पेपरमधे दिलेली जाहिरात शिक्षणाधिकारी (माध्य) याचे NOC मुलाखती आलेल्या शिक्षकाची यादी त्याचे शिक्षण, अनुभव, निवड समिती मधे संस्थेचे पदाधिकारी शिक्षण समितीचे पदाधिकारी, शिक्षण विभागाचे समाजकल्याण विभागाचे पदाधिकारी यांची यादी. निवड झालेल्या शिक्षकांची यादी देणे नेमणूकीचे आदेश, शाळा समितीचा ठराव प्रस्ताव व शिक्षणाधिकारी यांनी अप्रुवल दिल्याची प्रत, अशी माहिती मागितलेली असून माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २८/०६/२०१० रोजी ४ प्रथम अपीले दाखल केली. चारही प्रथम अपीलांमध्ये मुख्याध्यापक हे उपस्थित झाले अपीलकर्ता हे उपस्थित झाले नाही.

म्हणून सुनावणी न घेता चारही प्रथम अपीले खारीज करण्यात आली. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे चारही द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी सुरुवातीला नोंदणीकृत टपालाने माहिती घेणार असा अर्ज पाठविला होता परंतू त्यांच्या अर्जावर कार्यवाही करण्यात आली नाही. त्यानंतर त्यांनी साध्या टपालाने अर्ज पाठविला. परंतू त्यांना सर्व माहिती प्राप्त झाली नाही. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविलेला अर्ज त्यांना मिळाला नाही. मात्र साध्या टपालाने पाठविलेला अर्ज हा दि. ०२/०६/२०१० रोजी त्यांना मिळाला व त्याप्रमाणे दि. ०३/०६/२०१० च्या पत्रानुसार माहितीच्या करिता खर्चाचा भरणा करण्याचे पत्र पाठविले. परंतू सदरचे पत्र हे "स्विकारण्यास नकार दिला" असा पोस्टमनने शेरा लिहून परत पाठविले. जनमाहिती अधिकारी जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे पोस्टाचा शेरा व पत्राची प्रत दाखविली. त्यामध्ये अपीलकर्ता यांना माहितीच्या अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांनी एकमेकांचे अर्ज टपालाने स्विकारले नाहीत. याबद्यलच वाद सुरु केला. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता जरी गैरहजर होते तरी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडून माहिती घेवून निर्णय देणे आवश्यक होते. परंतू अपीलकर्ता गैरहजर आहेत म्हणून अपील खारीज करणे हे योग्य नाही. असे असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही पूर्ण केली असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे अपीलकर्ता यांची अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत. परंतू त्यांना माहिती मिळणे महत्वाचे असल्यामुळे व जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कार्यवाही केलेली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा अपीलकर्ता यांना चारही अर्जाच्या संदर्भामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अतिरिक्त खर्चाचे विवरण पोस्टाने कळवावे. त्याकरिता पोस्टाचा खर्च सुध्दा कळविण्यात यावा. व अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतरच त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांची चारही अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांची चारही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांना माहितीच्या अतिरिक्त खर्चाचे विवरण त्याचा टपालखर्च हा कळविण्यात येवून खर्चाचा भरणा केल्यानंतर मागितलेली संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत द्वितीय अपील.**

**<u>अपील क्र. १२८०/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री ओमप्रकाश साधुजी डोंगरे<br>मु. खाडीपार पो. पांढरी<br>ता. सडक / अर्जुनी जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी<br>पंचायत समिती सडक / अर्जुनी<br>ता. सडक / अर्जुनी जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>ग्राम पंचायत खाडीपार पो. पांढरी<br>ता. सडक / अर्जुनी जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०/०९/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०२/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी सचिव ग्रामपंचायत कार्यालय खाडीपार पो. पांढरी त. सडक/अर्जुनी जि. गोंदिया यांचेकडे दलित वस्ती सुधार योजनेची संपूर्ण माहिती, फुले, शाहू, आंबेडकर पुरस्काराची संपूर्ण माहिती, सन २००१ (मार्च) ते मार्च २००९ पर्यंत दलित लोकांच्या हितासाठी

शासनाने दिलेला अनुदान अशाप्रकारे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जदार दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारक आहे व माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि. १६/०२/२०१० रोजी अपीलकर्ता यांना सन २००१ ते मार्च २००९ पर्यंतची मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती व पोस्टल खर्च अंदाजे रुपये १०००/- ते २०००/- पर्यंत येण्याची शक्यता आहे व सदर खर्च हा एवढा ग्राम पंचायत समिती भरुन देण्यास तयार नाही. सध्या ग्राम पंचायतीची आर्थिक स्थिती बरोबर नसल्यामुळे व ह्यामध्ये सदरचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असून ग्राम पंचायतीच्या विकास कामांवर त्याचा परिणाम होईल. तरी आपण मागितलेली माहिती ग्राम पंचायत कार्यालय खाडीपार येथे उपलब्ध असुन आपण प्रत्यक्ष दिनांक दि. २६/०२/२०१० रोजी शासकीय वेळेत सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत ग्राम पंचायत कार्यालय खडीपार येथे सरपंच व सचिव हयांच्या समक्ष माहिती पाहणी करुन समाधान करुन घ्यावे असे पत्र सरपंच व इतर साक्षीदार ग्राम पंचायत खाडीपार यांच्या सह्या घेवून अपीलकर्ता यांना पाठविण्यात आले. परंतु पत्र घेण्यास अपीलकर्ता यांनी नकार दिला. त्यानंतर दि. २६/०२/२०१० रोजी पत्र पाठविले. आज त्याची प्रत मिळाली आहे. परंतू अपीलकर्ता यांनी माहिती घेतली नाही किंवा तपासली नाही. मात्र दि. २६/०४/२०१० रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी हे प्रथम अपीलीय अधिकारी नाहीत. त्यामुळे सदरचे अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी पंचायत समिती सडक / अर्जुनी गोंदिया यांचेकडे पाठविले त्यांनी निर्णय देतांना संपूर्ण माहिती देण्यास रुपये १०००/- ते २०००/- चा खर्च असल्यामुळे जवळपास रु. १००/- पर्यंतचे खर्चाची माहिती झेरॉक्स करुन देण्यात येईल. व उरलेल्या माहितीचे ग्राम पंचायत कार्यालयात येवून अवलोकन करावे असे आदेशीत केले. परंतू सदरची माहिती घेण्यास अपीलकर्ता आले नाही. किंवा पोस्टाने घेण्याचे सुध्दा कळविले नाही. त्यामुळे १०० प्रती काढून ठेवलेल्या आहेत त्याचा सुध्दा खर्च ग्राम पंचायतीच्या निधीतूनच केलेला आहे. असे असले तरी अपीलकर्ता हे माहिती तपासण्यास आले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत द्वितीय अपील.**

**अपील क्र. १२६८/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. उकंडसिंह लक्ष्मणसिंह यादव<br>मु. पो. राजेन्द्र वार्ड, माताटोली, गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. धर्मदाय आयुक्त<br>सामाजिक न्याय नोंदणी कार्यालय गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष<br>गोंदिया जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन गोंदिया<br>मु. पो. बेलाटी खुर्द स्टेशन टोली, तिरोडा ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/०९/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. १०/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १४/०६/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष गोंदिया जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन गोंदिया यांचेकडे दि. १२/०६/२०१० ला जिल्हा कार्यकारिणी सभेचे कार्यवृत्त (गोरेगाव मुक्कामी) देणे बाबतची माहिती मागितलेली आहे.

३.	सदर अर्जाच्या  अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. १९/०६/२०१० च्या पत्रान्वये सचिव पेन्शनर्स असोसिएशन यांनी आपणास दि. १५/०६/२०१० ला आपले पत्र मिळण्यापूर्वी रजिस्ट्रीने कार्यवृत्त प्रत पाठविलेली आहे (RLA 2633 Dt. 15/06/2010 अन्वये) असे कळविलेले दिसते. परंतू अपीलकर्ता यांना सदरचे पत्र प्राप्त झाले नाही या कारणास्तव अपीलकर्ता यांनी दि. १९/०७/२०१० रोजी सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती ही गोंदिया जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन या धर्मदाय आयुक्त यांचेकडे पंजीबध्द झालेल्या संस्थेकडे मागितली होती. परंतू त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. त्यावर संस्थेचे सचिव यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी कागदपत्रे दाखल केली आहेत. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या सभेचे कार्यवृत्त त्यांना या पूर्वीच उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच गोंदिया जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन जिल्हा गोंदिया या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही. कारण पेन्शनर्स असोसिएशन यांना शासनाकडून कोणताही निधी किंवा अनुदान प्राप्त होत नाही. ती एक विश्वस्त संस्था असुन पंजीबध्द झालेली आहे. ही बाब अपीलकर्ता यांना सुध्दा मान्य आहे त्यामुळे याचिका क्र. ५२९४/०८ (भास्करराव कुळकर्णी) विरुध्द राज्य माहिती आयोग मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी ज्या सार्वजनिक विश्वस्त संस्थेस शासनाकडून अनुदान मिळत नाही त्या संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही असा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे गोंदिया जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन हे धर्मदाय आयुक्त यांचेकडे पंजीबध्द असले तरी त्यास शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नसल्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (१) मधील सार्वजनिक प्राधिकरण या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही. त्यामुळे त्यास अधिनियमाच्या तरतुदीं लागू होत नाही. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (१) (च) मधील माहिती या संज्ञेच्या व्याख्येच्या संदर्भात "कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रानिक स्वरुपातील आधारसामुग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी

कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधीत माहिती, यांचा समावेश होतो" अशी तरतुद असल्यामुळे सहा. धर्मदाय आयुक्त हे सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत येत असल्यामुळे व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० च्या तरतुदींप्रमाणे त्या कार्यालयात पंजीबध्द असलेल्या सार्वजनिक विश्वस्त संस्थे बद्यलची माहिती उपलब्ध करुन घेता येते. त्यामुळे सदरची माहिती त्या-त्या संस्थेकडून जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन घेवून ती अपीलकर्ता यांना पुरविता येईल. त्याकरीता अपीलकर्ता यांना सहा. धर्मदाय आयुक्त कार्यालयातील माहिती अधिकारी यांचेकडे गोंदिया पेन्शनर्स असोसिएशन या पंजीबध्द सार्वजनिक विश्वस्त संस्थेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून अर्जदारास पुरवावी असा अर्ज सादर करणे संयुक्तिक राहील.

५. आज या प्रकरणामध्ये सहा. धर्मदाय आयुक्त हे माहिती अधिकारी नाहीत. त्यामुळे त्यांना तसे आदेश देता येणार नाही. व गोंदिया जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत द्वितीय अपील.**

## अपील क्र. १२८२/नाग/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु. निशा शामरावजी वाडीभस्मे<br>राजगुरु वार्ड भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **अपीलकर्ती** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक<br>निशा विद्यालय, आंबेडकर वार्ड, भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०/०९/२०१०)**

## नि र्ण य

१. अपीलकर्ती यांनी दि. १८/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०२/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ती गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री येरणे अधिक्षक हे उपस्थित आहेत.

२.	अपीलकर्ती यांनी दि. १७/०४/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी निशा विद्यालय आंबेडकर वार्ड, भंडारा यांचेकडे श्री रहांगडाले, श्री वझाडे, श्री टेंभुर्णे, श्री लांजेवार, श्री बोकडे (स.शि.) श्री इन्कने (लिपीक) यांच्या ६ व्या वेतन आयोगाचे वेतन निश्चिती केलेल्याच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३.	अर्जाच्या अनुषंगाने दि. २१/०८/२०१० रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद यांनी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक निशा विद्यालय यांना दि. ३०/०६/२०१० अन्वये अपीलकर्तीने मागणी केलेली माहिती द्यावी असे पत्र दिले. व दि २०/०९/२०१० रोजी अपीलकर्तीने स्वतःची माहिती न मागता शाळेतील शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ६ व्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीच्या छायांकित प्रतींची मागणी केली आहे असे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) यांना पत्राद्वारे कळविलेले दिसून येते. परंतू मागितलेल्या छायांकित प्रतींचा येणारा खर्च दिला नव्हता करिता आपण मागणी केलेल्या श्री रहांगडाले, श्री वझाडे, श्री टेंभुर्णे, श्री लांजेवार, श्री बोकडे (स.शि.) श्री इन्कने (लिपीक) यांच्या ६ व्या वेतन आयोगाच्या निश्चिती संदर्भात प्रपत्रांच्या १-१ छायाप्रतींची फी भरुन घेवून जावे असे कळविलेले दिसून येते. परंतू ती माहिती अपीलकर्ती यांनी घेतली नाही व नंतर दि. ०४/०९/२०१० रोजी तीच माहिती अपीलकर्ती यांना उपलब्ध करुन दिली व त्यांनी ती माहिती घेतलेली आहे. परंतू तत्पूर्वीच अपीलकर्तीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते.

४.	आज अपीलकर्ती हजर नाहीत. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ती ह्या स्वतः संबंधीत विद्यालयात प्रयोग शाळा परिचर असून संस्थेचे कोषाध्यक्ष आहेत. व त्यांचे बंधू मनोज वाडीभस्मे हे शिक्षक असून संस्थेचे सचिव आहेत. ते मुख्याध्यापकांना त्यांच्याच संस्थेची माहिती मागत आहेत. ती माहिती त्यांना संस्थेच्या बैठकीत मागता आली असती. कारण ६ व्या वेतन आयोगाविषयी संस्थेची बैठक घेणे आवश्यक असले पाहिजे. असे असल्यामुळे अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो परंतू त्यांनी ती माहिती नाकारली आहे. त्यावरुन त्यांना माहितीची आवश्यकता नाही असे दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १२८३/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ. बबीता ईश्वर रामटेके<br>घर क्र. ३२६६/एफ/९, न्यु कैलास नगर, जिन्नाथ किराणा स्टोर्स समोर, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्ती** |

**वि रु द्ध**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त<br>महानगर पालिका नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी<br>झोन क्र. ३, हनुमान नगर, महानगर पालिका नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०/०९/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ती यांनी दि. २९/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ०२/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २०/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ती हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे सहाय्यक आयुक्त श्री कराडे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दि. २८/०६/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी झोन क्र.३, हनुमान नगर नागपूर यांचेकडे गडरचे पाणी व केरकचरा दिलेल्या १२ वर्षापासून आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ती यांना झोनल ऑफिसर आरोग्य विभाग यांनी दि. ०२/०७/२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ती यांनी दि.०२/०७/२०१० रोजी मुद्येनिहाय उत्तर दिलेले पत्र स्विकारण्यास नकार दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी खुलाशात नमूद केल्याचे दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ती यांनी दि. २९/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी संदर्भात दाखल केलेल्या खुलाशात प्रथम अपील प्राप्त झाले नाही असे नमूद केलेले दिसते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अर्जदार स्वतःच परिसर अस्वच्छ करतात व सर्वांशी त्यांचे भांडण आहे. त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन मध्ये सुध्दा तक्रार केलेली असून त्यांना अटक देखील करण्यात आली होती. त्या स्वतःच गडरमध्ये कचरा टाकतात व इतर रहिवाशांना त्याचा त्रास होतो. तसेच त्या अनधिकृतरित्या राहतात व आरोग्य विभागाने कार्यवाही केल्यास काम करु देत नाहीत व अडथळा आणतात. त्यामुळे त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे. प्रथम अपील प्राप्त नाही व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. ११२१/नाग/२०१०**

१. श्री सुरेन्द्र पुंडलिकराव रेवतकर - **अपीलकर्ता**
प्लॉट नं. ३४५, हनुमान मंदिर जवळ, आय. यु.डि.पी. काटोल
ता. काटोल जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
स्पेशल इनव्हेस्टीगेशन डिपार्टमेंट (SID)
मुंबई उच्च न्यायालय मुंबई

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
(SID) मुंबई उच्च न्यायालय मुंबई

**(आदेश पारित दिनांक २३/०९/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २९/०७/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/०८/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत. सदर प्रकरणी गैरअर्जदारातर्फे सरकारी वकील ॲड नितीन सांबरे व ॲड. इ. एम. खापरे उच्च न्यायालय हे उपस्थित असून त्यांनी सुनावणीची पुढील तारीख मागितली आहे. त्याप्रमाणे दि.०६/०९/२०१० ही सुनावणीची पुढील तारीख त्यांना देण्यात आली आहे. त्यानुसार अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांचे तर्फे ॲड. नितिन सांबरे हे उपस्थित आहेत. त्यांनी पुन्हा पुढील मुदत मागितलेली आहे. त्यानुसार त्यांना दि.२३/०९/२०१० ही सुनावणीची पुढील तारीख देण्यात आली आहे. अपीलकर्ता हजर आहेत.

गैरअर्जदारातर्फे उपस्थित होणारे ॲड नितीन सांबरे हे आजारी असल्यामुळे त्यांच्या तर्फे करण्यात आलेल्या विनंती नुसार मा. आयुकतांच्या निदेशाने पुढील तारीख दिली तथापी अपीलकर्ता यांनी आक्षेप नोंदविल्यामुळे



सुनावणी घेण्यात आली त्यावेळी ॲड. खापरे माहिती अधिकारी उच्च न्यायालय हे उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०४/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि. ०४/०२/२०१० रोजी डेप्युटी रजिस्टार (SID) यांना केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाहीची माहिती टपालाने मागितलेली दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दि. १७/०५/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. २४/०५/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २२/०७/२०१० रोजी देण्यात आला असून अपील फेटाळण्यात आले आहे. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे ती विलंबाने उपलब्ध करुन देण्यात आली असून सदर माहिती ही समाधानकारक नाही. त्यांचे तक्रारीवर काय कार्यवाही झाली अशी माहिती त्यांनी मागितलेली होती. परंतू तक्रारीवर झालेली कार्यवाही ही संपूर्ण न कळविता सदरची तक्रार ही मा. मुख्य न्यायाधिश मुंबई उच्च न्यायालय यांचेसमोर ठेवण्यात आली होती, त्यांनी ती नस्तीबध्द करण्यात यावी असा आदेश दिलेला आहे एवढेच सहाय्यक प्रोऑनेटरी (ॲडमीन) ॲण्ड पब्लीक इनफॉरमेशन ऑफीसर मुंबई यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यांना त्याबाबतची संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी तक्रार केलेली आहे त्या तक्रारीची चौकशी ही गोपनीय असते व त्या संदर्भात जी कार्यवाही झाली असते ती सर्व कार्यवाही मा. मुख्य न्यायाधिश व इतर दोन मा. न्यायाधिश मुंबई उच्च न्यायालय यांचेकडे टिपणीच्या स्वरुपात सादर केली जाते व त्यामध्ये मा. न्यायाधिश यांना आदेश करण्याची विनंती केली जाते. त्याप्रमाणे सदरच्या टिपणीमध्ये नस्तीबध्द करावी किंवा मा. न्यायाधिश हे आदेश पारित करतील असे पर्याय दिले असतात. व त्या

पर्यायाप्रमाणे मा. मुख्य न्यायाधिश यांनी नस्तीबध्द करण्यात यावे असे आदेश दिलेले आहेत. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले आहे.

५. मा. उच्च न्यायालयात सुध्दा सर्वसाधारण याचिकेवरील निर्णय कळविण्यास सुध्दा अशाप्रकारची कार्यवाहीबाबत तरतुद आहे व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले आहे. तरीसुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे होते की, त्या चौकशीची कारणमीमांसा असल्यामुळे आदेशाची प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे त्यावर जी कार्यवाही झाली असेल त्या कार्यवाहीच्या संदर्भात आयोगाकडे कागदपत्रे सुध्दा दाखल करावे व आयोगाने निरिक्षण केल्यानंतर योग्य तो निर्णय देण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांना सांगण्यात आले. व त्याप्रमाणे आज माहिती अधिकारी ॲड. खापरे यांनी आयोगापुढे मुळ कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्यात. त्यांचे निरिक्षण केल्यावर वर नमूद केल्याप्रमाणे मा. मुख्य न्यायाधिश व मा. न्यायाधिश उच्च न्यायालय मुंबई यांनी नस्तीबध्द करण्याचे आदेश दिलेले असल्याचे निरिक्षणात आढळून आल्याने दिलेली माहिती योग्य आहे असे दिसून आले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

## अपील क्र. १३१०/नाग/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री देवेंद्र विजयसिंग गहेरवार<br>किल्ला वार्ड, जुनि बस्ती, तिरोडा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु द्ध** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)<br>जिल्हा परिषद भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका<br>आर. एस. जी. के. अग्रवाल हायस्कुल, तुमसर<br>ता. तुमसर जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २३/०९/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०६/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचेकडे श्रीमती जे. बी. नायगावकर यांची प्रथम नियुक्तीपासून प्रत्येक सत्रापुरती पदाच्या मान्यतेपुढील आदेशाची सहाय्यक शिक्षिका या पदाचे मा. शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांचेकडून मिळालेल्या पदाच्या मान्यतेची प्रत, तसेच शैक्षणिक सत्र १९९०-९१ व १९९१-९२ या कालावधीतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे हजेरी रजिस्टरची आणि याच सत्रातील पगार पत्रक देयकाची प्रमाणित सत्यप्रत, श्री पी.एन. शर्मा यांची शरिरिक शिक्षक म्हणून

पदोन्नती देण्यात आलेल्या कार्यवाहीची प्रमाणित प्रत दि. ११/०७/२००८ पर्यंतची बिंदु नामावलीची प्रमाणित प्रत, दि. ३०/०४/२०१० पर्यंतची बिंदु नामावलीची प्रमाणित प्रत, जानेवारी २०१० च्या हायस्कुल विभागाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या हजेरी नोंदवहीची प्रमाणित प्रत इ. माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. १५/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांना मुद्या क्र. १ व ६ ची माहिती उपलब्ध झालेली आहे परंतू मुद्या क्र. २, ३, ४, ५ ची माहिती उपलब्ध झाली नाही. मुद्या क्र. २ ची माहिती अपूर्ण सुध्दा आहे. व संपूर्ण माहिती ही विलंबाने उपलब्ध झाली आहे. ३० दिवसांच्या कालावधीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जनमाहिती अधिकारी ह्या मुख्याध्यापिका आहेत परंतू त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदींची काहीच माहिती दिसून येत नाही. व मुख्याध्यापिका असून सुध्दा त्यांना त्याबद्यलची माहिती उपलब्ध करुन घेण्याची आवश्यकता दिसत नाही. माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यावर अतिरिक्त खर्चाची माहिती ही जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविणे आवश्यक असते. कारण किती खर्च येईल हे त्यांना माहित असते त्यामुळे अपीलकर्ता यांना अतिरिक्त खर्चाची रक्कम कळविणे आवश्यक असते. अपीलकर्ता यांनी खर्चाची रक्कम भरल्यास माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. किंवा रक्कम न भरल्यास माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नसते. परंतू मुख्याध्यापिका असूनही व मराठी येत असूनही, कायदा सुध्दा मराठीत असून त्या स्वतःच्या मनानेच काहीतरी पत्रे लिहीतात व शिक्षणाधिकारी यांना मागदर्शन मागतात. त्यामुळे त्यांनी सर्व माहिती शिक्षणाधिकारी यांचेकडे दिली व ती ही अपूर्ण दिली. शिक्षणाधिकारी यांचेकडून माहिती घेणार असे अपीलकर्ता यांनी सांगितल्यामुळे ती शिक्षणाधिकारी यांचेकडे दिली असे मुख्याध्यापिका यांचे म्हणणे आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना मुद्या क्र. २, ३, ४ व ५ चे संदर्भात माहिती उपलब्ध असल्यास अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दि.०७/०५/२०१० च्या अर्जातील मुद्या क्र. २, ३, ४ व ५ च्या संदर्भात जी माहिती उपलब्ध आहे त्या माहितीच्या संदर्भातील संपूर्ण कागदपत्रे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १३०३/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री घनश्याम सुखदेवराव धनविज<br>C/o, राजु सुखदेवराव रनदिवे<br>मु. वर्धा, सुदामपुरी, वार्ड नं. ६,<br>पो. ता. जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १, नागपूर विभाग, नागपूर<br>सोमलवार भवन, माऊन्ट रोड, सदर, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी/सदस्य सचिव<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १, नागपूर विभाग, नागपूर<br>सोमलवार भवन, माऊन्ट रोड, सदर, नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २३/०९/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २७/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०४/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे श्री जर्नादन बकाराम खोत यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्र करीता सादर केलेले महसूल पुरावे तसेच वंशावळीचे जाती विषयक महसुली पुराव्यांच्या प्रमाणित प्रती मिळणेबाबत दोन मुद्यांमध्ये सर्वसाधारण टपालाने माहिती घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदर अर्जाच्या अनुषंगाने त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे दि. २७/०४/२०१० ला त्रयस्थ पक्षास विचारणा केली होती परंतू

त्यात कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. १८/०६/२०१० ला प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. २१/०७/२०१० रोजी देण्यात आला असून व अपील मंजूर करण्यात आले असून १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला आहे. परंतू त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, त्रयस्थ पक्ष म्हणून श्री जनार्धन बकाराम खोत यांनी कोणतेही उत्तर पाठविलेले नाही व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचा आदेश दिलेला असून सुध्दा व त्यानंतर पुन्हा अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज करुन सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. दि. ०९/०८/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी सदर प्रकरण जवळ जवळ ७ ते ८ वर्षापूर्वीचे असल्याने आपणास उपलब्ध करुन देण्यास्तव वेळ लागण्याची शक्यता आहे तरी प्रकरणाचा शोध लागताच माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याचे कळवीले जरी असले तरी दि.१७/०४/२०१० पर्यंत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले. आजही सुनावणी पर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही. व माहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळच करीत असल्याचे अपीलकर्ता यांनी सांगितले. उत्तरवादी यांना दि. १३/०९/२०१० रोजी हस्तबटवडाच्या माध्यमातून सुनावणीची नोटीस दिली होती. अपीलकर्ता यांनी तीच नोटीस पोस्टाने पाठविली त्यांना ती मिळाली परंतू हस्तबटवड्याने त्याच दिवशी नोटीस पाठविलेली असून सुध्दा उत्तरवादी आज हजर नाहीत. उत्तरवादी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही किंवा माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळच करण्यात आली आहे अशी आयोगाची खात्री झाल्यामुळे त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. ०३/०४/२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. आयोगाच्या आदेशाचे पालन न केल्यास शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी. व विलंबास जे जे जबाबदार असतील त्यांचेविरुध्द शास्ती लादण्यात येईल.

२. अपीलकर्ता यांच्या दि. ०३/०४/२०१० च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती त्रयस्थ पक्षाची असल्यास अर्ज मिळाल्यापासून १० दिवसांचे आत प्रक्रिया करावयाची असते. ती जनमाहिती अधिकारी यांनी विलंबाने केलेली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर सुध्दा दि. ०९/०८/२०१० च्या अर्जाच्या नंतर सुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रु.५०००/- ची शास्ती लादण्यात येते.

सदर शास्तीची वसूली जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून करण्यात येवून ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

## <u>अपील क्र. १२२८/नाग/२०१०</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती वंदना राजेन्द्र खटी<br>छत्रपती नगर, प्लॉट नं. १०२, जिजामाता उद्यान जवळ, नागपूर<br>ता. जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>हिंगणघाट<br>ता. हिंगणघाट जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सिरस्तेदार<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय, हिंगणघाट<br>ता. हिंगणघाट जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २३/०९/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १७/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ०७/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हे दि.०७/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस हजर आहेत. उत्तरवादी हे कर्मचारी संघटनेच्या संपामुळे गैरहजर आहेत. त्यामुळे अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सुनावणीस उपस्थित राहण्याकरिता पुढील तारीख २३/०९/२०१० ही देण्यात आली. त्याप्रमाणे दि. २३/०९/२०१० ला अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे नायब तहसिलदार श्री ब. वी. भुजबळ हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २८/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी सिरस्तेदार तथा उपविभागीय अधिकारी हिंगणघाट यांचेकडे अपील क्र. ०९/RTS-६४/०७-०८ मौ. अलीपुर मध्ये दिनांक २०/०३/२०१०

रोजीचा आदेश पारीत करते वेळी विचारात घेण्यात आलेल्या कागदपत्राच्या प्रति पुरविणे बाबत एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि. १४/०७/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. १६/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. ०९/०८/२०१० रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्याने सदरचे अपील नस्तीबध्द केले आहे. सदर निर्णयाने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, RTS अपील क्र. ९/आरटीएस-६४/०७-०८ उपविभागीय अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी हिंगणघाट यांचे न्यायालयीन निर्णय दि. २०/०३/२०१० मध्ये ज्या कागदपत्रांचा आधार घेवून निर्णय दिलेला आहे त्या कागदपत्रांची माहिती त्यांनी मागितलेली आहे परंतू जी माहिती उपलब्ध आहे ती दिली आहे व जी इतर माहिती उपलब्ध नाही त्या माहितीच्या संदर्भात उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. व जी माहिती यवतमाळ जिल्ह्याशी संबंधीत आहे ती त्याच जिल्ह्यातून प्राप्त करावे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे अपीलकर्ता यांचा अर्ज, उपलब्ध करुन दिलेली माहिती व प्रथम अपीलाचा निर्णय याचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १३०६/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विकास गणपत लोंढे<br>मु. कोंढाळा पो. दहेगांव<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी<br>जिल्हा परिषद चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी<br>पंचायत समिती वरोरा<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २३/०९/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे अधिक्षक श्री डेकाटे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २९/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वरोरा जि. चंद्रपूर यांचेकडे कोंढाळा येथील शालेय प्रगतीचा अहवाल याबाबत मार्च २००७ ते मे २०१० या कालावधीतील माहिती एकूण ५ मुद्यांमध्ये मागितलेली असून नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. ०५/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र माहिती अधिकारी शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जि. वरोरा यांना अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी दि.०२/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरची मागितलेली माहिती ही शाळा स्तरावरील असल्यामुळे अर्ज हा शाळेस दि. १८/०६/२०१० रोजी हस्तांतर करण्यात आला आहे. मात्र मुख्याध्यापक तथा शासकीय माहिती अधिकारी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कोंढाळा यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरचा अर्ज हा त्यांना दि. २१/०६/२०१० रोजी प्राप्त झाला परंतू पत्रावर दि.१८/०६/२०१० ही तारीख जरी असली तरी निर्गमित केलेली तारीख ही दि. १३/०७/२०१० आहे व त्यावर अधिक्षकांची सही आहे. याचाच अर्थ अर्ज हा पंचायत समिती मधेच दीड महिना पडून होता व त्यामुळे तो विहीत मुदतीत उपलब्ध होवू शकला नाही. उच्चश्रेणी मुख्याध्यापक म्हणून माहिती अधिकारी दि.३१/०७/२०१० रोजी पत्र प्राप्त होताच पत्र व अर्ज प्राप्त होताच दि. ०३/०८/२०१० ला अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी हरकत घेतली आहे. व त्यांनी मागितलेली माहिती ही तेवढ्या पृष्ठांची नाही असे त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये म्हटले आहे. परंतू असे असले तरी जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वरोरा जि. चंद्रपूर यांनी व पंचायत समितीतील अधिकाऱ्यांनी सदरचा अर्ज हस्तांतर करण्यासच विलंब केलेला आहे. अर्ज कोणत्याही प्राधिकरणाकडे प्राप्त झाल्यानंतर व अधिनियमाचे कलम ७ (६) प्रमाणे सुरवातीच्या ५ दिवसात माहिती हस्तांतर करणे आवश्यक असते. परंतू अपीलकर्ता यांचा अर्ज हा दीड महिना पंचायत समितीतच पडून होता त्यामुळे पंचायत समितीतीत जे जे अधिकारी किंवा कर्मचारी त्या अर्जास जबाबदार असतील ते सर्व विलंबास कारणीभूत आहेत. त्यामुळे त्यांचेविरुध्द रु ५०००/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. जेणेकरुन माहितीचा अर्ज हा ३० दिवसात निकाली काढणे याची त्यांना जाणीव होईल. माहितीचा खर्च रु. ५०००/- हा कळविण्यात आलेला आहे व तो अवाजवी खर्च आहे असे अपीलकर्ता यांनी नमूद केले असले तरी मुख्याध्यापक यांनी त्याबाबतचे विवरण देणे आवश्यक आहे. व जो खर्च येईल तो खर्च हा

विलंबास जबाबदार असलेल्या माहिती अधिकारी, कर्मचारी किंवा अधिक्षक यांनी करावयाचा आहे व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या. सदर छायांकित प्रतींचा येणारा खर्च हा पंचायत समितीतील जे अधिकारी / कर्मचारी विलंबास जबाबदार असतील त्यांना करावयाचा आहे.

२. जनमाहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी तसेच पंचायत समितीचे अधिकारी / कर्मचारी हे अर्जाच्या हस्तातंरणाच्या विलंबास जबाबदार असल्यामुळे खंडविकास अधिकारी यांनी विलंबाची जबाबदारी प्रत्येकांवर निश्चित करुन चौकशी करावी व जबाबदारी निश्चित केल्यावर त्या सर्व अधिकारी /कर्मचारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) अन्वये रुपये ५०००/- ची शास्ती लादण्यात येते. ती वसूल करुन लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ". मध्ये जमा करावी. तसेच मुख्याध्यापक यांना छायांकित प्रतींचा जो खर्च येईल तो खर्च सुध्दा जबाबदारी निश्चित केल्यामुळे अधिकाऱ्यांकडून मुख्याध्यापक यांना द्यावा.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १२४७/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती विजयालक्ष्मी बकाल<br>रा. महात्मा फुले वार्ड, चितोडा<br>ता.जि. वर्धा | - | **अपीलकर्ती** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>वर्धा, ता. जिल्हा वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय वर्धा<br>ता. जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २४/०९/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ती यांनी दि. १८/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ती गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचे वतीने तलाठी श्री सी. ची. धुवे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे कनिष्ठ लिपिक श्री रासपाईके हजर आहेत. परंतू अपीलकर्ती गैरहजर असल्यामुळे त्यांना दि. २४/०९/२०१० ही सुनावणीची पुढील तारीख देण्यात आली आहे. त्याप्रमाणे दि. २४/०९/२०१० ला अपीलकर्ती गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वर्धा यांचा फॅक्स संदेश प्राप्त झाला असून त्यात अयोध्या प्रकरणाचा निकाल असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवेल त्यामुळे वर्धा येथे राहणे त्यांना आवश्यक असल्याने दि. १६/०९/२०१० रोजीच कागदपत्रे सादर केली आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दि. १२/०४/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय वर्धा यांचेकडे विक्रीपत्राचे आधारे प्लॉटवर नावे नोंदविण्याबाबत माझे अशिलांनी दि. ३०/०६/२००९ ला दिलेल्या अर्जाबाबतची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. सोबत दिलेल्या अर्जामध्ये एकूण १० मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती ही तलाठी स्तरावरील असल्याने माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी अर्जाचे हस्तांतर हे तलाठी मौजा नालवाडी यांचेकडे केले.

३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दि. ३१/०५/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतू दि. ११/०६/२०१० च्या पत्रान्वये उपविभागीय अधिकारी यांनी अपीलकर्ती यांना माहिती अधिकारी तलाठी, (नालवाडी) असल्यामुळे अपील हे नायब तहसिलदार यांचेकडे करणे आवश्यक आहे असे कळवून अपील नस्तीबध्द केले. त्यानंतर पून्हा प्रथम अपील दाखल करण्यात आलेले नसल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नाही. त्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ती यांच्या दि.१८/०४/२०१० च्या अर्जानुसार दि. १०/०५/२०१० च्या पत्रान्वये विहित मुदतीत खर्चाचा भरणा केल्यावर माहिती नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात येईल असे अपीलकर्तीस कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ती ही गैरहजर असल्यामुळे त्यांना पत्र मिळाले किंवा नाही याबाबत त्यांनी द्वितीय अपील मेमो मध्ये कोणत्याही प्रकारचे वर्णन केलेले नाही. त्यामुळे माहिती अधिकारी यांनी खर्चाचा भरणा केल्याचे पत्र पाठविल्याचे गृहीत धरावे लागते. अपीलकर्ती यांचे वकील यांना माहिती ही कोणत्या अधिकाऱ्याकडे मिळेल याबद्यलची माहिती असणे गृहीत आहे. त्यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता माहिती ही तलाठी स्तरावरील असल्याने ती तलाठी यांचेकडेच उपलब्ध असते त्याकरिता त्यांनी मूळ अर्ज हा तलाठी यांचेकडे करणे आवश्यक होते. प्रथम अपील सुध्दा त्यांनी नायब तहसिलदार यांचेकडे न करता उपविभागीय अधिकारी यांचेकडे केले होते. उपविभागीय अधिकारी हे अपीलीय अधिकारी नाहीत हे कळविणे म्हणजे तकलादू कारण नाही. अधिनियमाच्या तरतुदी जशा उत्तरवादी यांना लागू आहेत तशाच त्या अर्जदार यांना सुध्दा लागू आहेत. अधिनियमाचे तरतुदींप्रमाणे अर्ज करणे अपेक्षित असते. तलाठी यांनी विहित मुदतीत खर्चाचा भरणा करणेबाबत कळविले असल्याने माहितीकरिता खर्चाचा भरणा करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ती यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ती यांना दि. १०/०५/२०१० च्या जनमाहिती अधिकारी तथा तलाठी यांच्या पत्राप्रमाणे खर्चाचा भरणा करुन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १२४६/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री प्रेम साजनदासजी बंसतानी<br>गुरुनानक वार्ड, हिंगणघाट<br>ता. हिंगणघाट जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद हिंगणघाट<br>ता. हिंगणघाट जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कर अधिक्षक<br>नगर परिषद हिंगणघाट<br>ता. हिंगणघाट जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २४/०९/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २०/०८/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २४/०८/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/०९/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. सदर प्रकरणाची सुनावणी दि. २४/०९/२०१० ला ठेवण्यात आली आहे. दि.२४/०९/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १९/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कर अधिक्षक नगर परिषद हिंगणघाट यांचेकडे नगर परिषद अध्यक्ष श्री सुधीर दौलतचंद कोठारी व सौ. सरोज सुधीर कोठारी यांनी जगन्नाथ वार्ड मध्ये बांधकाम केलेल्या ईमारतीचा मंजूर नकाशा त्याकरिता नगर परिषदेकडे डेवलप्मेंट चार्ज किती पटविला

त्याची रसीद व रसीदची झेरॉक्स प्रत, कम्प्लीशन सर्टीफिकेट व त्या नकाशावर लागणारा कर व कराची डिमांड नोट देण्यात यावी अशी माहिती मागितलेली आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दि. ०९/०६/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. ०३/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १६/०८/२०१० रोजी देण्यात आला असून उपलब्ध असलेली माहिती दि. १७/०८/२०१० पर्यंत देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतू तेव्हापर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांना मुदतीत जी माहिती उपलब्ध करुन दिली ती अपूर्ण माहिती दिली व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा माहिती दिली नाही मात्र राज्य माहिती आयोगाची नोटीस आल्यानंतर दि. १५/०९/२०१० च्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती संबंधीत फाईल इतरत्र हलविल्यामुळे मिळत नसल्याने माहिती देण्यास विलंब होत आहे. फाईल मिळताच माहिती पुरविण्यात येईल असे कळविले होते व त्याप्रमाणे माहिती देण्यात येत आहे असे सदर पत्रानुसार कळविले आहे. परंतू अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली ती माहिती त्यांना संशयास्पद वाटते. एकतर माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली व सदरची नस्ती ही नगर परिषदेत उपलब्ध नसावी ती अध्यक्षांच्या घरी आहे असे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, नगर परिषदेच्या ३ इमारती एप्रीलपासून पाडण्यात आल्या आहेत. तसेच सदरचे रेकॉर्ड इतरत्र हलविण्यात आले आहेत. त्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन देता आली नाही. परंतू अपीलकर्ता यांच्या म्हणण्यानुसार नगर परिषदेच्या अध्यक्षांच्या स्तरावरील माहिती असल्यामुळे ती देण्याची टाळाटाळ झाली व अजुनही नस्ती उपलब्ध झालेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. असे असल्यास अपीलकर्ता यांनी संबंधीत नस्तींचे निरिक्षण करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांना कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी हजर राहून संबंधीत नस्तींचे निरिक्षण करावे. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना संबंधीत मुळ नस्ती ह्या निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्याव्यात. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(विलास पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..........**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**